

# बार कोड

## शिल्पा फडके

1980 मध्ये वाढत असताना, बारकोड याचा अर्थ काहीतरी पूर्णपणे वेगळा होता. आपल्या परदेशी मालावर आकर्षकरित्या तो छापलेला असे. त्याची जागा व रूप जितके विदेशी तेवढेच उद्दीपित करणारे होते. आता मात्र असे बारकोड्स खूपच परिचित आहेत. त्यांचा वापर अनेक मोठ्या भारी दुकानात होतो. त्याद्वारे ग्राहक व उपभोक्त्याशी होणारा व्यवहारावर नियंत्रण ठेवण्याच्या जागतिक साच्यामध्ये आपण एकरूप झालो आहोत हेच सूचित होते.

अलिकडच्या काही वर्षांमध्ये मुंबईत बार कोड याचा अर्थ काहीतरी वेगळे दर्शविणारा असू शकतो. तरीही कदाचित थोडा संबंधित. या निबंधाच्या हेतूसाठी मी तो अर्थ थोडा विस्तारणार आहे. तो वस्तूच्या वर छापलेला बारकोड असेल किंवा क्रेडिट कार्डावरील कोड असेल किंवा वागणुकीचे नियम (कोड) या अर्थी दोन प्रकारच्या बारसाठी असेल. एक बेकायदेशीर ठरण्याऱ्या बेतात असलेले डान्स बार्स आणि दोन उच्चभ्रूंचे नाईट क्लब अथवा डिस्कोथेक्स.

या दोन प्रकारच्या बारसंबंधातील तीन मूलभूत गोष्टींवर मी या निबंधात प्रकाश टाकणार आहे. प्रथम या बार्सचे स्थान (लोकेशन) आतल्या अवकाशाचीविभागणी आणि त्या अंतर्भूत असलेली प्रभावी धर्मसत्ता आणि शेवटी या अवकाशाच्या वेगवेगळ्या हद्दींना लागून असलेले अर्थ व त्यांच्यामधील अन्योन्यक्रियेचे नियम.

शहराच्या संदर्भात दोन्ही प्रकारचे बार्समध्ये वेगवेगळेपणा दिसून येतो. डान्सबार्स शक्य तेवढे लोकांच्या नजरेत चटकन न येणारे असतात. कोणताही बार आपण डान्सबार आहोत हे जाहीर करत नाही. त्याचे जे आश्रयदाते त्यांना तो माहीत असणे किंवा विचारून त्यांची माहिती करून घेणे अपेक्षित असते. त्यावरील फलक तिथे एक निरुपद्रवी रेस्टॉरंट किंवा रेस्टॉरंट व बार असल्याचे दर्शवतो. गेल्यावर्षीपर्यंत तर अनेकांना देवदेवतांची नावे दिलेली होती, जोवर आदरणीय महाराष्ट्र सरकारने ठरवले की त्यांच्या मते अशी नावे देणे हे ईश्वरनिंदेसमान आहे. हे डान्सबार्स बहुधा शहराच्या गचाळ गल्ल्यांमध्ये असत. तिथे काहीही

वैशिष्ठपूर्ण नाही म्हणूनच ती ओळखली जात असते, अशा गल्ल्यांत.

उच्चभ्रूंचे बार्सबद्दल बोलायचे तर तो जेवढा उठून दिसू शकेल तेवढा दिसला पाहिजे. चोखंदळ माणसांच्या नवनवीन फॅशन्स व फॅड्स पुरवणारा बार असा तो दिसायला हवा. शहराच्या अत्यंत महागड्या विभागात तो असायला हवा जिथे वॅलेट पार्किंगची सोय असावी, व बाहेर उभ्या असलेल्या मोठमोठ्या कार्सबद्दल त्याने बेफिकीरी दर्शवावी. त्यांची नावे अशी असतात की त्यांनी राष्ट्रीय सीमा पार केलेल्या असतात व टेलिव्हिजन शोजमध्ये किंवा वेगवेगळ्या वृत्तपत्रांच्या तिसऱ्या पानावर दाखवल्या जाणाऱ्या शहरातील रात्र-जीवनात ते दाखवले जातात.

उच्चभ्रू बार हे जागतिक खर्चाच्या जगांत महत्त्वाची भूमिका बजावणाच्या शहराच्या इच्छेचे प्रतिनिधीत्व करतात व डान्सबार्स शहराच्या दारुत बूडालेला शहरातील अप्रिय समाज तो कडेला रेटला पाहिजे तो दर्शवतात.

दोन्ही प्रकारच्या बार्समध्ये आतल्या अवकाशाच्या रचनेमध्ये नृत्याची जागा ही अत्यंत क्षुल्लक असते. डान्सबारमध्ये मुली नाचतात ती जागा व ग्राहक बसतात ती जागा या वेगवेगळ्या ठरवलेल्या असतात. बारमधल्या नाचणाऱ्या मुली आपली जागा सोडून इतर जागी त्याच्या ग्राहकांकडून टिप्स घेण्याच्या निमित्ताने जातात. पण ग्राहक तसे जागा सोडून जात नाहीत. खरं तर जुलै 2004 मध्ये महाराष्ट्र सरकारने या दोन्ही जागा एकमेकांपासून वेगळ्या करण्याचा बार्सना परिपत्रक पाठवून प्रयत्न केला. त्यांनी असे म्हटले की नाचणाऱ्यांनी ग्राहकांपासून किमान 5 फूटांचे अंतर ठेवावे व डान्सर्स भोवती 3 फूट उंचीची भिंत बांधावी. तसेच आठ नर्तकांसाठी किमान 120 चौ.फूट जागा असावी. एकमेकांच्या जागांमध्ये अतिक्रमण करण्यात शिस्त रहावी म्हणून ही आखणी ठरवण्यात आली. त्यामुळे नृत्य करण्याची जागा ही नृत्यविष्काराची जागा ठरवली व जिथे प्रेक्षकवर्गाला जाण्यास बंदी घालण्यात आली. याला दुसराही एक हेतू आहे. कारण डान्सबार ही दूषित जागा आहे व त्यातही नृत्याविष्काराची जागा इथे जास्त उल्लंघनाची शक्यता आहे म्हणूनच अधिक पर्यावरण-दूषित होण्याची शक्यता आहे.

उच्चभ्रूतेचे डिस्कोमध्ये नृत्याची जागा ही लिंग-विभक्त जागा नसते. उलट जी जागा एरिना म्हणून वापरली जाते तिथे स्त्री-पुरुष मुक्तपणे एकमेकांत मिसळतात. भिन्न लैंगिकतेचा महोत्सव आणि म्हणून अत्याधुनिकता चालते. हेही लक्षात घेणे मनोरंजक ठरेल की क्रेडिट कार्डावरील बारकोड हे कायदेशीर चलन म्हणून वापरता येते, व भिन्नलैंगिक वागणुकीसंबंधीचे इतर प्रकारचे नियंत्रक नियम (कोड्स) तितकेसे स्पष्टपणे पाळले जात नाहीत. याबाबतीत काही गोष्टींचे अस्तित्त्व - या ठिकाणी क्रेडिटकार्ड - या ठिकाणचा सर्वसाधारण अर्थच बदलू शकत, व या जागेचा संबंध जागतिक आर्थिक व्यवहाराशी जोडते. आणि या प्रक्रियेत ही जागा व त्यात घडणाऱ्या गोष्टी यांना अधिक मान्यताप्राप्त करून देते.

या दोन्ही जागा बाह्यत: पाहिल्यास एकमेकांपासून फार वेगळ्या नाहीत. दोन्हीकडे दारू, संगीत, नृत्य, पुरुष व स्त्रिया आहेत. स्तंभलेखक अनिल धारकर म्हणतात त्याप्रमाणे ‘‘जसे बारमधल्या एका ग्राहकाने काही वेळाने एकाद्या नर्तकीशी भेट ठरवावी तशीच एखाद्या जोडप्याने महागड्या रेस्टॉरंटमध्ये एखाद्या समुद्राचा देखावा दिसणारी बेडरुममध्ये आरामशीरपणे लैंगिक सुख घेण्याचे ठरवावे’’ तसे हे आहे.

मग या दोन जागांना वेगवेगळे अर्थ कशामुळे लावले जातात व त्यांच्यातील हे नाते कोणते की ज्यामुळे एक जागा आदरणीय दुसरी संशयास्पद ठरते? यांच्यातील मुख्य फरक या दोन जागांतील. खासगी जागांना असलेली किंमत आणि त्यांचे नाते. तांत्रिकदृष्ट्या दोन्ही जागा तितक्याच सार्वजनिक व खासगी आहेत. सर्व लोकांसाठी खुल्या या अर्थाने सार्वजनिक व खासगी या अर्थापुरत्या मर्यादित की तेथील प्रवेश मालकांकडून नियंत्रित केलेला असतो व प्रवेशासाठी प्रत्यक्ष

(कव्हरचार्ज) वा अप्रत्यक्ष (खाणजेवण) किंवा दोहोंसाठी पैसे आकारले जातात.

तथापि डान्स बारमधील नृत्यविष्काराच्या स्वरुपामुळे ग्राहक व नर्तिका यामधील नाते सार्वजनिक बनते. यांच्या विरुद्ध उच्चभ्रूंच्या बारमध्ये स्त्रिया व पुरुष दोघेही ग्राहक असतात व त्यांच्यातील नाते ही खासगी गोष्ट समजली जाते. एका विशिष्ट संदर्भात फक्त खासगी शृंगारिक संबंधास कायदेशीरपणा (नैतिकता) प्रदान केला जातो व डान्स बार मात्र अनैतिक प्रकारांचे प्रदूषित स्थान मानले जाते. उलट उच्चभ्रूंच्या बारमधील नात्यांच्या खासगी स्वरुपामुळे त्या जागा केवळ आदरणीय नव्हे तर जागतिक ग्राहकांच्या दृष्टीने जवळजवळ पवित्र मानल्या जातात. आदरणीयता, नैतिकता, जागतिक व शहरातील बार जागेचे स्थान (लोकेशन) कोणी कोणत्या जागी जावे किंवा वावरावे हे ठरवतात. इतकेच नव्हे तर कोणत्या जागा कायदेशीर (नैतिक) आहेत व कोणत्या नाहीत हेसुद्धा.

**टीपा :**

1) पाहा http://in.com/news/2004/feb/27bars.htm यासंबंधातील आर्टिकल्ससाठी
2) या वादविवादाच्या सविस्तर चर्चेसाठी शिल्फा फडके यांचा हा लेख वाचा. "You can be lonely in a crowd : the production safety in Mumbai" in Indian journal of gender shudies New Delhi. Sage Feb. 2005
3) इ इंडियन एक्सप्रेस, जुलै 29, 2004
4) अनिल धारकर, मिड-डे, ऑगस्ट 25, 2004

**अनुवादक : एस. एन. निबंधे**

▪ ▪ ▪ ▪ ▪

